१३/८/१३



# किमान एक झाड जपा

**जैवविविधतेचा पाया असणाऱ्या वृक्ष-वनस्पतींचं माणसाच्या आणि प्राण्यांच्याही जीवनचक्रातलं महत्त्वाचं स्थान शनिवारी 'हिरवाई' या उपक्रमात उलगडलं.**

**▸▸ पुणे टाइम्स टीम**

एका कुटुंबाचा विस्तार दर्शवणारा वटवृक्ष अर्थात 'फॅमिली ट्री' आपण पाहतो. तसंच एक झाडही जैवविविधता जपण्यासाठी किती महत्त्वाची भूमिका बजावतं, याचे पैलू शनिवारी केतकी घाटे यांच्या माहितीपूर्ण व्याख्यानातून उलगडले.

जीविधा आणि इंद्रधनुष्य पुणे महानगरपालिका यांच्यातर्फे आयोजित 'हिरवाई' या उपक्रमात घाटे यांचं 'वनस्पती : जैवविविधतेचा पाया' या विषयावर व्याख्यान झालं. दाट जंगलातल्या सदाहरित, पाणझडी, पाणथळ, गवताळ कुरणातल्या, डोंगर उतारावरच्या, ओढ्याकाठच्या वनस्पती आणि त्यावर जगणारे कीटक, पक्षी, प्राणी यांची परिसंस्था याबाबत घाटे यांनी या व्याख्यानात माहिती दिली.

एका झाडाचं उदाहरण घेतलं, तरी त्याच्या छायेत, सालीवर, ढोलीमध्ये, फांद्यांच्या पहिल्या थरावर आणि उंचीवर विविध प्रकारचे जीव जगत असतात. म्हणूनच झाडांना जैवविविधतेचा पाया म्हटलं जातं, असं सांगत घाटे यांनी विविध प्रकारचे बुलबुल, सर्पगरुड, स्वर्गीय नर्तक, मलबार व्हिसलिंग थ्रश, शमा, सनबर्ड यासारखे पक्षी तसेच ऐन, हिरडा, बेहडा, उंबर, जांभूळ, गेळा, अंजनी, रुई, गारंबी अशा वृक्षवेली, त्यांचं स्थान यांचीही माहिती दिली.

'माणसांनो किमान एक झाड जपा' असा संदेश देणाऱ्या या व्याख्यानानं उपस्थितांना अंतर्मुख केलं. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात कलावर्धिनीसंकुलच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या 'पंचमहाभूते' या संकल्पनेवरील नृत्याला उपस्थितांची दाद मिळाली.

## आज सांस्कृतिक